# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ५७ व ५८/२००६/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. रामकृष्ण हरिबा निकम,<br>मु.पो. शेगांव, ता.जत, जि. सांगली<br>२) श्री. आमसिध्द परसाप्पा बसर्गी,<br>मु.पो. करजगी, ता.जत, जि. सांगली<br>तर्फे श्री. एच.डी. खापरे, प्रतिनिधी,<br>रा.जत, जिल्हा-सांगली. | तक्रारदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.<br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु ग्रामीण विभागीय कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभागीय कार्यालय, जत, जि. कोल्हापूर<br>४) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु उपविभागीय कार्यालय, संख, ता.जत,<br>जि. सांगली. | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :- १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य
३) एम.बी. भाजीभाकरे, सदस्य-सचिव

महाराष्ट्र वीज नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

तक्रारदार सर्वश्री रामकृष्ण निकम, रा. शेगांव व आमसिध्द बसर्गी, रा. करजगी यांनी अनुकृमे दि. २६/६/२००६ व दि. ५/७/२००६ रोजी अध्यक्ष, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली मंडल, सांगली येथे विहित "क्ष" नमुन्यांत आपल्या शेती पंपास वीज पुरवठा अद्यापि केला नसल्याची तक्रार नोंदविली होती. तथापि त्याकामी कक्षाने ६० दिवसांत कोणताही निर्णय न दिल्याने अर्जदारांनी वि.प. यांचे विरूध्द प्रस्तुतचे अपील दि.१५/९/२००६ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे दाखल केले आहे.

अर्जदारांची प्रमुख तक्रार खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते :-

उभय अर्जदारांनी शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी वीज मंडळाकडे अनुक्रमे दि. १२/७/१९९६ व दि. २५/३/२००० रोजी अर्ज केला होता त्यावेळी त्यांनी आवश्यक असलेली डिपॉझीटची रक्कमही वि.प. कडे भरणा केली होती तथापि त्यांना अद्यापि वीज पुरवठा करण्यांत आलेला नाही. यावरून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाने धारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरुवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण ) विनियम २००५ चे परिशिष्ठ "अ" मध्ये नमुद केल्याप्रमाणे कृती मानके साध्य करण्यास वि.प. यांना अपयश आले आहे. सबब अर्जदारास नियमानुसार देय भरपाई मिळून त्यांच्या शेती पंपास कृती मानकाप्रमाणे वीज पुरवठा करण्यांत यावा अशी अर्जदारांची मागणी आहे.

प्रकरणी सुनावणीची ता. १७/१०/२००६ रोजी नेमली होती. त्यावेळी तक्रारदारांचे वतीने श्री. खापरे यांनी आपली बाजू सविस्तरपणे मांडली. तसेच वि.प. यांनी अर्जदारांचे मागणीबाबत वस्तुस्थिती कथन करून असे सांगितले की तक्रारदार श्री. आमसिध्द बसर्गी, रा.करजगी हे मागासवर्गीय असल्याचे त्यांनी कक्षामध्ये दाखल केलेल्या "क्ष" नमुन्यांतील माहितीवरून लक्षांत आल्याने त्यांना प्राधान्याने वीज पुरवठा करण्यांत येत आहे. त्यानुसार वि.प. यांनी श्री. बसर्गी यांचे एन.डी.एस.सी.पी. खाली सुधारित अंदाजपत्रक मंजुर करून घेतले आहे. तसेच सदर कामाकरिता ८ पोल उभे केलेले आहेत तथापि पाऊसामुळे वीज कनेक्शन चालू करतां आले नाही ते दि ३०/११/२००६ पर्यंत करण्यांत येत आहे. श्री. रामकृष्ण निकम यांचे कामीही पोल टाकण्याचे काम पूर्ण होत आले असल्याने त्या दोघांनाही ३०/११/२००६ पर्यंत वीज पुरवठा करण्यास वि.प. स कसलीही अडचण नाही यावर श्री खापरे यांनी वि.प. यांचे कथन वस्तुस्थितीनिष्ठ असल्याचे मान्य करून वि.प.ने कबुल केल्याप्रमाणे तक्रारदारांचे शेती पंपास वीज पुरवठा केल्यास अर्जदारांची कसलीही तक्रार रहाणार नाही तसेच विलंबाच्या कारणास्तव मागणी केलेली दंडाची रक्कम / नुकसान भरपाई सोडून देण्यास अर्जदार तयार आहेत असे सांगितले. सुनावणीचेवेळी वि.प.यांनी पुढे असेही सांगितले की प्रकरणी अनावधानाने सुनावणी करण्याचे तसेच विहित मुदतीत निर्णय देण्याचे राहून गेले. एकंदरीत वि.प. यांनी कबुल केल्याप्रमाणे कार्यवाही केल्यास अर्जदार यांची तक्रार निवारण होणार आहे. ही बाब विचारांत घेऊन मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. वि.प. यांनी कबुल केल्याप्रमाणे विहीत मुदतीत म्हणजे दि. ३०/११/२००६ पर्यंत अर्जदार यांच्या शेती पंपास वीज पुरवठा करावा. त्यामुळे अर्जदारांची तक्रार निवारण होईल.

२. वि.प. यांनी सदरच्या आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ८.३ चे तरतुदीसार मंचास दि. ३१/१२/२००६ पर्यंत कळवावे.

| | | |
|---|---|---|
| (एम.बी.भाजीभाकरे) | (जी. सी. लेले) | (के. व्ही. पाटील) |
| सदस्य – सचिव | सदस्य | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर |